Desktop:/Letter१०(K.Ahire)

(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये)

# जाहीर सुचना

क्रमांक – ननिवि/वशि/३२७/२०२५ दि.२३/०७/२०२५

ज्याअर्थी, विद्यमान नाशिक शहरालगतच्या नविन शहराचा (यापुढे "नविन नाशिक" असे उल्लेखिलेले) नियोजनबध्द व सुयोग्य विकास होणेच्या दृष्टीने राज्य शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) च्या कलम ४० चे उपकलम (१) अन्वये प्रदत्त अधिकारांचा उपयोग करन, अधिसुचना क्रमांक टिपीएस-११७४-१८६६० RPC, दिनांक २७ जानेवारी १९७५ अन्वये, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (मर्यादित), महाराष्ट्र यांचे (यापुढे – सिडको - असे उल्लेखिलेले) नविन नाशिककरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे, (यापुढे उक्त "नविन नाशिक" असे उल्लेखिलेले)

आणि ज्याअर्थी, नाशिक नगर परिषद दिनांक ७ नोव्हेंबर, १९८२ रोजी हद्द वाढीसह नाशिक महानगरपालिकेत रुपांतरीत झाली आहे,

आणि ज्याअर्थी, नविन नाशिक क्षेत्राकरिता नियोजन प्राधिकरण सिडको असून नाशिक महानगरपालिका क्षेत्रासाठी नाशिक महानगरपालिका नियोजनन प्राधिकरण आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त नविन नाशिकचे क्षेत्रामध्ये सिडकोने एकूण ६ गृहनिर्माण योजना राबविल्या असून उक्त नविन नाशिक क्षेत्रातील सेवा सुविधांची पुढील देखभाल योग्य पध्दतीने होण्याच्या दृष्टीने उक्त नविन नाशिकचे क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण सिडकोऐवजी नाशिक महानगरपालिका होणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने नाशिक महानगरपालिका व सिडको यांच्या मध्ये दि. २२ एप्रिल, २०१६ रोजी नागरी सुविधांचे नाशिक महानगरपालिकेस हस्तांतरणाबाबत करारनामा (यापुढे "उक्त करारनामा" असे उल्लेखिलेले आहे) झाला आहे व या दोहोंनी उक्त करारनाम्यातील शर्तींच्या अधीन राहून सदर हस्तांतरणास मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, प्रभाग क्र. २९ मधील गणेश चौक येथील नेबरहूड सेक्टरमधील शाळा इमारत यांसी क्षेत्र १०८२३.०० चौ.मी. ही मनपाला दि. २२/०४/२०१६ च्या करारनाम्यानुसार व त्यातील अट क्र. ५ नुसार सदरची बांधीव मालमत्ता (विकसित शाळा इमारत) जसे आहे तसे या तत्वावर रक्कम रु. १००/- प्रतीवर्ष नाममात्र भाड्याने ६० वर्ष कालावधीकरीता देखभाल व दुरुस्तीसह चालविणेसाठी हस्तांतरीत करणेत आलेली आहे. तसेच अट क्र. २(६) प्रमाणे सिडको विभागाने दि. १७/०३/२०२५ रोजी नाहरकत दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सिडकोने दि. २०/०७/२०१६ रोजीच्या महासभा क्र. २७५ अन्वये मनपाने उक्त नविन नाशिक अधिसुचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नाशिक महानगरपालिका यांची नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करावी. अशी विनंती नाशिक महानगरपालिकेचे शासनास केली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने अधिसुचना क्र. टिपीएस-१११६/प्र.क्र.९८/२०१६/नवि-९, दि. १४ ऑक्टोबर, २०१६ च्या अधिसुचनेव्दारे नविन नाशिक अधिसुचित क्षेत्राकरिता सिडकोचे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य दि. १४/१०/२०१६ पासून संपुष्टात आणण्यात येऊन या दिनांकापासून उक्त अधिनियमाचे कलम १६० चे उपकलम २ मधील तरतुदी अंमलात येतील आणि या क्षेत्रासाठी नाशिक महानगरपालिका नियोजन प्राधिकरण राहील व क्षेत्रासाठी मंजुर असलेले सिडकोचे नियोजन प्रस्ताव व विकास नियंत्रण नियमावली यापुढेही लागू राहील अशी अधिसुचना प्रसिध्द केलेली आहे. आणि ज्याअर्थी प्रशासक, सिडको नवीन नाशिक यांनी त्यांचेकडील दि.०४/०३/२०२५ चे पत्रान्वये "सदर शाळा वापरामध्ये बदल करावयाचा झाल्यास कलम ३७ अन्वये शासनाची मंजुरी घेवुन वापरात बदल करणे" चे नमुद केले आहे

आणि ज्याअर्थी, सिडको वसाहतीमध्ये वास्तव्यासाठी स्थायिक झालेल्या कामगार बहूल वर्गासाठी मोठे हॉस्पिटल मध्ये उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामूळे विविध दुर्धट आजारावर उपचार करणेसाठी अत्याधुनिक हॉस्पिटल उभारण्याची मागणी आहे. या इमारतीतील मनपा शाळा बंद असून सिडको विभागात इतरही शाळा उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रभाग क्र. २९ मधील गणेश चौक येथील नेबरहूड सेक्टरमधील शाळा इमारत यांसी क्षेत्र १०८२३.०० चौ.मी. या जागेवर १०० खाटांचे हॉस्पिटल उभारण्यास खालील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये किरकोळ फेरबदल कार्यवाही करणेच्या प्रस्तावास महासभेने ठराव क्र. १३१, दि. १२/०६/२०२५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, नाशिक महानगरपालिकेने वरील ठरावाचा विचार करुन, उक्त विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये खालील परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे नेबरहूड सेक्टरमधील शाळा इमारतीच्या आरक्षणात बदल करण्याचे ठरविले आहे.

२३३५

## परिशिष्ट

| अ.क्र. | आरक्षण क्र. | जागेचा तपशिल | नाशिक शहराच्या सुधारित मंजूर विकास आराखडयानुसार सद्यस्थितीतील प्रयोजन | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये करणेचा नियोजित किरकोळ फेरबदल |
|---|---|---|---|---|
| १ | - | नेबरहूड सेक्टर, गणेश चौकामधील शाळा इमारत | शाळा इमारत व क्रिडांगण | शाळा इमारत व क्रिडांगण या वापरामधून वगळून १०० खाटांचे अद्यावत हॉस्पिटल करणेबाबत. |

सदरहु नियोजित आरक्षणातील फेरबदल करणेबाबतच्या भाग नकाशाची प्रमाणित केलेली प्रत नाशिक महानगरपालिकेच्या राजीव गांधी भवन, शरणपूर रोड येथील प्रशासकीय कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेत ठेवली असून जनतेस योग्य ती फी भरुन उपलब्ध होऊ शकेल.

ज्या नागरिकांना सदरहु नियोजित फेरबदलांबाबत हरकती/सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी ही नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. वरील मुदतीनंतर आलेल्या सुचना/हरकती यांचा विचार केला जाणार नाही.

मनिषा खत्री (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सदरची सुचना नाशिक महानगरपालिकेच्या www/nmcnashik.gov.in या वेबसाईटवर देखील उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

U/s 37(1) of Maharashtra & Town Planning Act, 1966

# PUBLIC NOTICE

No./T.P.D./WS/329/2025 Dt23/07/2025

Whereas, with a view to the planned and proper development of the new city adjacent to the existing Nashik city (hereinafter referred to as "New Nashik"), the State Government has, in accordance with the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (37 of 1966), In exercise of the powers conferred by sub-section (1) of section 40 of the Act (hereinafter referred to as the "Act"), the City and Industrial Development Corporation (Limited), Maharashtra (hereinafter referred to as CIDCO) vide Notification No. TPS-1174-18660 RPC, dated the 27th January, 1975, (hereinafter referred to as the said "New Nashik") has been appointed as the Special Planning Authority for New Nashik.

And whereas, Nashik Nagar Parishad was converted into Nashik Municipal Corporation with extension of its area on 7th November, 1982,

And whereas, the planning authority for the new Nashik area is CIDCO and the Nashik Municipal Corporation Planning Authority is for the Nashik Municipal Corporation area

And whereas, CIDCO has implemented a total of 6 housing schemes in the said New Nashik area and in order to ensure proper maintenance of the service facilities in the said New Nashik area, the Planning Authority for the said New Nashik area has been appointed as Nashik instead of CIDCO. It is necessary to become a Municipal Corporation. Accordingly, an agreement was signed between Nashik Municipal Corporation and CIDCO on April 22, 2016 regarding the transfer of civic amenities to Nashik Municipal Corporation (hereinafter referred to as the said agreement mentioned) has been made and both of them have approved the said transfer subject to the terms of the said agreement.

And whereas, the school building in the Neighborhood Sector at Ganesh Chowk in Ward No. 29, measuring 10823.00 sq.m., is transferred to the Municipal Corporation as per the agreement dated 22/04/2016 and condition no. 5 thereof, the said building property (developed school building) as is On this basis, it has been transferred for operation with maintenance and repair for a period of 60 years at a nominal rent of Rs. 100/- per annum. Also, as per condition no. 2(6), CIDCO Department has given its approval on 17/03/2025.

And whereas, as per the General Body Reldution No. 275 dated 20/07/2016 Nashik Municipal Corporation is declared as Special Planning Authority for the said new Nashik Notified Area and also The Nashik Municipal Corporation has requested the government to declare it as the planning authority.

AND WHEREAS, the Govt vide notification no. TPS-1116/Pro.No.98/2016/Navi-9, dated 14th October, 2016, CIDCO cease to be as Special Planning Authority for the new Nashik Notified Area. with effect from 14/10/2016 and the provisions of sub-section 2 of section 160 of the said Act shall come into force from the date hereof and the Nashik Municipal Corporation shall remain the planning authority for this area and the planning proposals of CIDCO approved for the area and A notification has been issued stating that the Development Control Regulations will continue to be applicable And Whereas Administrator CIDCO, New Nashik vide letter dt. 04/03/2025 has informed Nashik Municipal Corporation to Initial U/s. 37 procedure for change of use from school to Hospital.

And since, for the large class of workers who have settled in CIDCO Colony, it is not financially affordable to get treatment in a big hospital. Hence, there is a demand

to build a state-of-the-art hospital to treat various accidents cases and diseases. Hence, there is a demand to build a state-of-the-art hospital to treat various accidents cases and diseases. In this School building Municipal Corporation schools are not functional and other schools are available in CIDCO division. Therefore, instead of the school building in the Neighborhood Sector at Ganesh Chowk in Ward No. 29 with an area of 10823.000 sq.m. new hospital to be constructed with 100 beds. The General body has approved the proposal to make minor modification under Section 37(1) of the Maharashtra Regional Town Planning Act, 1966 for the construction of a hospital as mentioned in the annexure below, vide Resolution No. 131, dated 12/06/2025.

And whereas, the Nashik Municipal Corporation, having considered the above resolution, has incorporated the Maharashtra Regional and Town Planning Act, in the said development plan It has been decided to make minor modification in the reservation of school buildings in the Neighbourhood Sector under Section 37(1) of M.R.T.P. Act, 1966 as mentioned in the following Schedule.

**Appendix**

| Sr. No. | Reservation No. | Location details | Present purpose as per the revised approved development plan of Nashik city | Minor modification proposed to be made under Section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 |
|---|---|---|---|---|
| 1 | - | School building in Neighborhood Sector, Ganesh Chowk | School building and playground | construction of 100-bed modern hospital, instead of school building and playground. |

A certified copy of the part plan regarding the modification of the said reservation is kept for public inspection during office hours at the administrative office of Nashik Municipal Corporation at Rajiv Gandhi Bhavan, Sharanpur Road and may be made available to the public on payment of an appropriate fee.

Citizens who wish to raise objections/suggestions regarding the proposed changes may do so within one month from the date of publication of this notice in the Maharashtra Gazette to the Commissioner, Nashik Municipal Corporation, Nashik, during office hours. Suggestions/objections received after the above deadline will not be considered.

Manisha Khatri (I.A.S.)
Commissioner/Administrator
Nashik Municipal Corporation, Nashik

Said Public Notice is also available on Nashik Municipal Corporation website www/nmcnashik.gov.in

# NASHIK MUNICIPAL CORPORATION,NASHIK

Rajeev Gandhi Bhavan,Sharanpur Road,(Post Box No.12) Nashik - 422002.

## PART PLAN OF SANCTIONED DEVELOPMENT PLAN OF TPS - 1174-18660-RPC.Date.27/01/1975

## CIDCO NASHIK : Poush Neighbourhood




**LEGEND**

SCALE - N.T.S

- HILLS & HILLOCKS
- M.I.D.C. BOUNDARY
- VILLAGE BOUNDARY
- NOTIFIED AREA BOUNDARY
- NEIGHBOURHOOD BOUNDARY
- WELL
- RAILWAY
- TELEPHONE LINE
- POWER TRANSMISSION LINES
- SECTOR BOUNDARY
- NALLA / RIVER
- ENCROCHMENT

| | |
|---|---|
| **Deputy Director**<br>of Town Planning<br>Nashik Municipal Corporation Nashik | **Hon.Commissioner/**<br>**Administrator**<br>Nashik Municipal Corporation Nashik |